MAH/MUL/ 03051/2012
ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Jan. To March 2023
Issue 45, Vol-12

Date of Publication
01 March 2023

**Editor**

**Dr. Bapu g. Gholap**

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली**
**नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले**
**वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले**

**-महात्मा ज्योतीराव फुले**

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Shivaji College of Hingoli

Date of Publication
01 March 2023

# Vidyawarta™

## International Multilingual Research Journal

www. विद्यावार्ता® .कॉम

YouTube Channel

*Vidyawarta is peer reviewed research journal. The review committee & editorial board formed/appointed by Harshwardhan Publication scrutinizes the received research papers and articles. Then the recommended papers and articles are published. The editor or publisher doesn't claim that this is UGC CARE approved journal or recommended by any university. We publish this journal for creating awareness and aptitude regarding educational research and literary criticism.*

*The Views expressed in the published articles, Research Papers etc. are their writers own. This Journal dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute, academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Editors and publishers have the right to convert all texts published in Vidyavarta (e.g. CD / DVD / Video / Audio / Edited book / Abstract Etc. and other formats).*

***If any judicial matter occurs, the jurisdiction is limited up to Beed (Maharashtra) court only.***

Indexed

IMPACT 9.154 iijif FACTOR

Govt. of India,
Trade Marks Registry
**Regd. No. 2611690**

Harshwardhan Publication Pvt.Ltd. • International Multilingual Research Journal • Certified Quality Management System ISO 9001:2015

**http://www.printingarea.blogspot.com**

Shivaji College Hingoli



27) संगीत शिक्षण में उत्तर प्रदेश की कुछ प्रमुख संस्थागत शिक्षण संस्थाओं का योगदान
ऐलिस गुप्ता, दिल्ली ||136

28) Child Labour and Child Rights in India: Need for Change
**Abhinav Berwal, Bikaner (Raj.)** ||140

29) Athavaninche Pakshi' (Bird of Memories'): A Saga of Suffering of Prof. P. E. ...
**Dr. Bhange Prakash B., Purna ( jn.)** ||146

30) A Journey Of Women For Self Realization
**Radha Mishra** ||149

31) A Comparative Study of Achievement Motivation of Learning Disabled and ...
**Ms. Sunita Yadav, Mr. Mukesh Verma, Rudrapur (UK) INDIA** ||153

32) STUDY OF ATTITUDE TOWARDS MARRIAGE AND LIFE SATISFACTION AMONG ADULTS
**Dr.Nawale Sanjay, Ahmednagar, Maharashtra, India** ||158

33) THE ROLE OF HRD PRACTICES IN MEDIA INDUSTRY FOR RESOURCES MANAGEMENT ...
**Natthan Rajak, Dr. Anil Prasad Yadav, Ranchi, Jharkhand** ||162

34) नववर्षात शेतीतील अस्थिरता दूर होईल का?
**डॉ. नितीन बाबर, सांगोला** ||169

35) साहित्य आणि समाज माध्यमे परस्परसंबंध
**प्रा.डॉ. संगीता मुंढे, हिंगोली** ||171

36) मानव मूल्यों के उत्थान में प्रेमचन्द का योगदान
**भरडवा नीतिन एच., राजकोट** ||174

37) शून्य गगन में अनहद नाद
**डॉ० संगीता शुक्ला, लखनऊ** ||179

38) झारखंड के निर्माण में उत्तरी छोटानागपुर के प्रमुख आंदोलकर्त्ताओं की भूमिका
**संजीता कच्छप, हजारीबाग** ||184

39) प्रौढ़ शिक्षा कार्यक्रम:हजारीबाग जिले के विशेष संदर्भ में
**डॉ.सरिता कुमारी, हजारीबाग, झारखंड** ||189

40) स्वामी विवेकानंदाचे शैक्षणिक विचार
**डॉ.सय्यद आर.आर., शिराढोण** ||196

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

35

# साहित्य आणि समाज माध्यमे परस्परसंबंध

प्रा.डॉ. संगीता मुंढे
शिवाजी महाविद्यालय हिंगोली

***********

समाज माध्यमे म्हणजेच प्रसारमाध्यमे होत. समाजाच्या गरजेतून समाजामध्ये जनजागृती, लोकशिक्षण घडवून आणण्यासाठी माध्यमांची निर्मिती झाली. अगदी प्राचीन काळापासून आपल्या समाजात अशी माध्यमे अस्तित्वात असलेली दिसतात.फक्तत्याचं स्वरूपवेगळे होते.उदा—किर्तन,प्रवचन,भारुड, वेगवेगळ्या लोककला इ. माध्यमातून समाजात जनजागृतीचे काम संतांनी, समाजसुधारकांनी केले आहे. साहित्य हे समाजाचं प्रतिबिंब मानल्याजाते. त्या त्या काळातील साहित्यात तत्कालीन घडामोडीचं प्रतिबिंब पडलेलं असतं. लोकसाहित्य, संत साहित्य यांच्या माध्यमातून लोकजागृतीचे फार मोठे कार्य त्या काळात झालेले दिसते. साहित्य आणि समाज यांचा संबंध हा बिंब, प्रतिबिंब या स्वरूपाचा आहे. साहित्यिक हा समाजाचा एक घटक असतो. या अर्थाने त्यांचे हे अनुभव समाजाचे अनुभव असतात. म्हणूनच आपल्याला एखादी कथा, एखादी कादंबरी,नाटक, यातील व्यक्तिरेखा या आपल्या जीवनाशी निगडित असल्याचा भास होतो.समाज माध यमेव साहित्ययांच्यानिर्मितीपाठीमागीलहेतू हा जवळपास सारखाच असलेला दिसतो. त्यामुळे समाज माध्यमे व साहित्य यांचा परस्परसंबंध पाहने महत्वाचे ठरते.

साहित्यही त्या साहित्यीकाची वैयक्तिकनिर्मीती असली तरी त्यातून व्यक्त झालेला जीवनानुभव हा त्यांचा एकट्याचा नसतो. साहित्यिक हा समाजाचा एक घटक असतो.त्यामुळे त्याचे जीवनानुभव हे एकाच वेळी स्वत:चे व त्याचवेळी समाजाचे असतात.डॉ. विद्या व्यवहारे यांच्यामते, साहित्य ही एक आशयप्रधान ललित कला असल्याने तिचा केवळ कलेच्या दृष्टीने अभ्यास करून चालत नाही. साहित्यातील आशय,व्यक्ती आणि समाजजीवन सलग्न असतो. साहित्यकृतीचे मोल ठरवितांना त्यातील जीवनमूल्य ही महत्त्वाची असतात.१ म्हणजेच साहित्य हेही समाजाच्या गरजेतूनच निर्माण झालेले दिसते. प्रसारमाध्यमेही समाजाच्या गरजेतूनच उदयास आली. लोकशिक्षण, मनोरंजन विशिष्ट विचाराचा प्रचार,प्रसार, मानवी मूल्यांचीरुजवणूक, मानवी हित ही काही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून प्रसारमाध्यमांचा उदय झाला. वर्तमानपत्र, आकाशवाणी, दूरचित्रवाणी, इंटरनेट, वेगवेगळ्या वाहिन्या,फेसबुक,ट्विटर, इंस्टाग्राम ही आजच्या काळातील काही प्रसारमाध्यमे होत. आजचे युग हे प्रसारमाध्यमांचे युग म्हणून ओळखले जाते. एक काळ होता की, ज्यावेळी माहितीचा स्त्रोत म्हणजे केवळ वर्तमानपत्र हे एक प्रसारमाध्यम मानल्याजायचेय पण आज अनेकविध प्रसारमाध्यमामुळे माहितीचा स्फोट झाला आहे. जगात कुठेही घडलेली घटना घरबसल्या क्षणात आपल्याला पहायला मिळते. या प्रसार माध्यमामुळे जग जवळ आले आहे. जागतिकीकरणानंतर च्या काळात तर हा बदल झपाट्याने झालेला दिसतो. अनेक परदेशी वृत्तवाहिन्या आपल्या देशात कायमच्या स्थिरावल्या आहेत. आज ही प्रसारमाध्यमे तीन रूपात पाहायला मिळतात. प्रिंट माध्यम,इलेक्ट्रॉनिकमाध्यम, आणि वेब माध्यम या तिन्ही माध्यमातून अनेक समाज माध्यमे एकूण समाजमनावर आपला कब्जा प्रस्थापित करत आहेत. मानवी मन,भावना,विचार, वर्तन हे यांनी कधीच आपल्या कह्यात केले हे माणसाला कळलं देखील नाही. एकेकाळी माहितीचा एक स्त्रोत म्हणून उद्यास आलेली ही माध्यमंआज जीवनाचा एक अविभाज्य घटक बनले आहेत. आज तर आपलं जगणं या माध्यमांनी नियंत्रित करून टाकलं आहे. आपल्या संपूर्ण खाजगी आयुष्यावरही या माध्यमांचा पगडा आहे.

समाज माध्यमे आणि मराठी साहित्य यांचा संबंध जर पाहिला तर तो घनिष्ठ अशा प्रकारचा आहे. सुरुवातीच्या काळात एकमेव माहितीचा स्त्रोत असणारे वर्तमानपत्र हे प्रसार माध्यम म्हणजे उत्तम साहित्याचा

नमुना होते दिनबंधू,शेतकऱ्याचा कैवारी, विजयी मराठा, ज्ञानप्रकाश,निबंधाला,शतपत्रे, केसरी,मराठा, नवाकाळ, सुधारक, मूकनायक, बहिस्कृतभारत इ.नियतकालिकांतून जे अग्रलेख छापून येत ते अग्रलेख तत्कालीन काळाच्या दृष्टीने जसे महत्त्वाचे होते, तसेच ते एक उत्तम साहित्य म्हणूनही महत्त्वाचे आहेत. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचीनिबंधमाला, लोकहितवादी यांची शतपत्रे ही एक सामाजिक दस्तऐवज म्हणून जशी उपयुक्तआहेत तशीच तीउत्तम साहित्याचा नमुना आहेत.स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक राष्ट्रीय नेत्यांनी तसेच समाज सुधारकांनी आपल्या विचाराच्या प्रसारासाठी नियतकालिके सुरू केली, पण हे त्या त्या काळातील उत्तम साहित्य आहे.प्रकाश मेदकर यांच्या मते, मराठवाडा हे साप्ताहिक संस्थानी राजवटीत लेखन स्वातंर्त्यासाठी दिलेल्या झुंजीचा इतिहास घडवणारे जसे ठरले, त्याचबरोबर मराठी भाषेची अस्मिता जपण्यासाठी लोकजागृती करण्याचा लक्षणीय प्रयत्न करणारेही ठरले.स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी साहित्यातील विविध प्रवाह, मराठी लेखकांचे अनुभव विश्व यांचा परिचय मराठवाड्यतील वाचकांना दैनिकाने करून दिला.२ खास साहित्याला वाहिलेली काही नियतकालिके स्वातंत्र्यपूर्व काळात निघत होती. या नियतकालिकांनीच अनेक साहित्यिक घडवले.उदा— करमणूक, मनोरंजन,रत्नाकर,यशवंत, किर्लोस्करइ. मासिकांमध्ये आपलं साहित्य छापून येने हे प्रतिष्ठेचे मानल्या जात होतं.अस्मितादर्श या मासिकाने अनेक दलित ग्रामीण साहित्यिकांना जन्म दिला असं म्हणावं लागेल. या मासिकाने या लेखकांना आपलं साहित्य प्रकाशित करण्याची संधी दिली आणि त्यातूनच मोठ्य प्रमाणावर लिखाण झालेले दिसते.सुद्धा जोशी यांच्या मते, कथेच्या जडणघडणीत, वाढत्या प्रमाणात होत गेलेल्या तिच्या निर्मितीत, एक स्वतंत्र साहित्य प्रकार म्हणून तिचे स्वत्व प्रस्थापित होण्याच्या प्रक्रियेत या नियतकालिक संस्कृतीचा महत्त्वाचा वाटा आहे.३ माध्यमामुळे अनेक नवोदित लेखक उद्यास आलेले दिसतात.

माध्यमामुळे लोकांना अनेक गोष्टीचेज्ञान होतं. त्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात आणि हे काम प्रसार माध्यम करत असतात. तसेच ती एक विशिष्ट अशी विचारधारा ही निर्माण करत असतात. आज आपण वेगवेगळ्या वाहिन्या किंवा वर्तमानपत्र हे कोणत्या विचाराशी, कोणत्या परंपरेशी किंवा कोणत्या पक्षाशी बांधील आहेत हे त्यातून व्यक्त होणाऱ्या बातम्या व त्याचे स्वरूप, विचारधारा यावरून सहज सांगू शकतो. खरंतर माध्यमाचं काम हे सत्य समोर आणून लोक जागृती करणे किंवा समाजाला एक विधायक दिशा दाखवणे हे आहे. मात्र आज ते होताना दिसत नाही. समाजामध्ये घडणाऱ्या बर्यास, वाईट घटनांचे प्रतिबिंब जसे माध्यमांमध्ये उमटत असते, तसेच ते साहित्यातूनही उमटत असते. म्हणूनच राज्यकर्त्यावर साहित्यिक व पत्रकार यांचा अंकुश असतो असं म्हटल्या जातं. त्यांना जाब विचारण्याचे सामर्थ्य या दोघांमध्ये आहे. आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या काळात प्रसारमाध्यमाचे स्वरूप अमुलाग्र बदलून गेलेआहे. आपण कल्पनाही करू शकत नाही इतक्या झपाट्याने हे तंत्रज्ञान बदलत आहे. त्यातही स्पर्धा मोठ्य प्रमाणावर वाढली आहे. त्यामुळे आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी ही प्रसार माध्यमे भल्याबुऱ्या मार्गाचा अवलंब करताना दिसतात. त्यामुळे जनतेचा विश्वास ही माध्यम हरवत चालली आहेत. वेगवेगळ्या वाहिन्यावरून जी बातमीपत्र प्रसारित होतात त्यावर कितपत विश्वास ठेवावा असा पवित्राप्रेक्षक घेत आहेत. म्हणजे सत्य सांगणे हे ज्यांचं मूळ ध्येय आहे ती प्रसारमाध्यमे आपल्या ध्येयापासून दूर होताना दिसत आहेत.समाजाची दिशाभूल करणे, मूळ प्रश्नांना बगल देऊन नको त्या गोष्टीत सामान्यांना अडकवून ठेवणे हे वारंवार होताना दिसत आहे.डॉ. मनोहर जाधव यांच्या मते, समाज संवेदनशील बनविण्यापेक्षा समाजाला बधीर करण्याचे काम सगळ्या वाहिन्या आणि त्यातील मालिका करीत आहेत. त्यांचे सादरीकरण आणि त्यांची जी चटकदार भाषा आहे, ती मोहात पाडणारी भाषा आहे. मध्यमवर्गीय आणि निम्नवर्गीय माणसांना बौद्धिक गुलाम करण्याचे काम पद्धतशीरपणे चालले आहे.४ म्हणजे समाजाला दिशा दाखवण्यासाठी प्रसार माध्यमांचा उदय झालेला असला तरी, आजच्या काळातील ही प्रसार माध्यमे लोकांची दिशाभूल करताना दिसतात. असं जरी असलं तरी सर्वच प्रसार माध्यमे या पद्धतीची आहेत असं म्हणता येत नाही. काही माध्यमं यातही आपलं वेगळेपण टिकवून शोध पत्रकारितेच्या माध्यमातून सत्य समाजासमोर आणण्याचा प्रयत्न करत आहेत. आपल्या ध्येयाशी ते एकनिष्ठ आहेत. तळागाळातील लोकांचा विकास त्यांच्या न्यायासाठी ती झगडताना दिसतातय पण त्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न नेहमी होतो. आपल्याला जे नको आहे ते संपवण्याचा सोयीस्कर प्रयत्न सध्या सुरू आहे गौरी लंकेश या तरुण पत्रकारितेची

हत्या हे याचे उदाहरण म्हणून सांगता येईल किंवा काल–परवाच बीबीसी या महत्त्वाच्या वृत्त वाहिनीच्या कार्यालयावर चौकशीच्या नावाखालीधाड टाकण्यात आली.अनेक प्रकारे चांगले काम करणाऱ्यांना विनाकारण चौकशीला सामोरे जावे लागते. अशा या काळात माध्यमांची भूमिका ही खूप महत्त्वाची आहे.

आज माध्यमांचा स्वरूप जसं बदलले आहे तसेच साहित्याचे स्वरूपहीबदललेले दिसतं. डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर यांच्या मते, मुद्रित माध्यमातील लेखन म्हणजेच साहित्य. ही पारंपारिक व्याख्या आज मागे पडत आहे. म्हणूनच फक्त छापील रूपातील लेखन म्हणजे साहित्य. हा नियम आता बदलला पाहिजे 'कोणत्याही माध्यमातील लेखन म्हणजे साहित्य.' संगणक, इंटरनेट, ब्लॉक, अर्कुट, फेसबुक इत्यादीच्या द्वारे आधुनिक साहित्याचे तांत्रिक स्वरूप सिद्ध होत आहे.५ यातून आपल्याला साहित्याच्या रूपात होत असलेला बदल लक्षात येतो. माध्यमांचं हे बदलणार रूप साहित्यिक साहित्याच्या माध्यमातून लोकांच्या समोर ठेवू शकतात. हाडाचा साहित्यिक समाजाला योग्य दिशा देण्यासाठी, मार्ग दाखवण्यासाठी, खरं खोटं सिद्ध करण्यासाठीच लिहीत असतो. त्यामुळे माध्यमं किंवा साहित्यिक हे समाजाचे वाटाडे असतात. त्यांनी आपली जबाबदारी ओळखून जर आपले काम इमाने इतबारे केले तर आपला भारत देश महासत्ता झाल्याशिवाय राहणार नाही.

साहित्यिक आपल्याला आलेल्या, पाहिलेल्या वाचलेल्या अनुभवाला साहित्यातून मांडत असतो.त्याचे अनुभवविश्व अधिक विस्तारित, वैविध्यपूर्ण करण्याचे काम माध्यमं करीत असतात. अनेक गोष्टी माध्यमांच्या सहाय्याने लेखकाला समजतात. त्यावर विचार मंथन करून त्याचे होणारे दुरगामी परिणाम तो साहित्यातून मांडत असतो. एखाद्या साहित्यिकाला किंवा साहित्यकृतीला प्रकाश झोतात आणायचे किंवा नाही हेही माध्यमच ठरवतात. बऱ्याच वेळेला चांगल्या कलाकृतीकडे हेतूपुरस्सरपणे डोळेझाक केली जाते. कारण यामध्ये काही राजकीय लागेबांधे गुंतलेले असतात. तेव्हा माध्यमांमध्ये एवढी शक्ती आहे की,रातोरात एखादी व्यक्ती हिरो किंवा व्हिलन म्हणून ते जगाच्या समोर उभी करू शकतात. आज माध्यमांचे स्वरूप जसं बदलत गेल आहे, तसेच साहित्य लिखाणातही अमुलाग्र बदल झाले आहेत. ब्लॉग लेखन हा एक नवीनच साहित्यप्रकार या क्षेत्रात रुजला आणि लोकप्रियही झाला आहे. ई–बुक्स ही एक संकल्पना अस्तित्वात आली आहे. एका क्लिकवर आपल्याला हवे ते पुस्तक आपल्या हातातील मोबाईलच्या सहाय्याने वाचता येते. जुन्या दर्जेदार पुस्तकांचे ईबुक रूपात रूपांतर करून ते चिरकालासाठी बद्ध केल्या जात आहे. कमी खर्चात, कमी जागेत बाळगायला सोपे असे हे नवे साहित्य नव्या रूपात आले आहे. हा सर्व परिणाम नव्या तंत्रज्ञानाचा व समाज माध्यमांचा आहे.या नव्या तंत्रज्ञानाचे जसे काही फायदे आहेत तसेच तोटेही असलेले दिसतातय पण या नव्या तंत्रज्ञानाचा फायदा जास्तीत जास्त समाजहितासाठी कसा करून घेता येईल याचा विचार साहित्यिकांनी करून समाजावरही स्वत:चा वचक कसा राहील हे पाहिले पाहिजे जेणेकरून माध्यमे व साहित्य हे परस्पर पूरक ठरतील. भाषा घडवण्याची व भाषेलाच चालती बोलती ठेवण्याचे काम माध्यम करत असतात.माध्यमे व साहित्य यांचा संबंध हा अन्योन्य प्रकारचा आहे.

**निष्कर्ष —**

१) साहित्य आणि समाज माध्यमे यांची निर्मिती समाजाच्या गरजेतूनच झाली आहे.

२) काळाच्या ओघात दोन्हींच्या ही रूपात अमुलाग्र असा बदल झाला आहे.

३) माध्यमे आपल्यासाठी आहेत की आपण माध्यमांसाठी हे माणसाने वेळीच ओळखून त्यावर उपाययोजना केल्या पाहिजेत.

४) आज समाज माध्यमे ही माणसाच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत.

५) माध्यमांनी आपला मुळ उद्देश विसरता कामा नये.

**संदर्भ —**

1) डॉ. व्यवहारे विद्या– साहित्य विमर्श, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद. प्रथम आवृत्ती २००३ पृष्ठ. ६५

२) मेदककर प्रकाश– मराठवाड्यातील साहित्य, संपादक– प्रल्हादजी.लुलेकर, कैलास पब्लिकेशन्स,औरंगाबाद. प्रथम आवृत्ती २००७ पृष्ठ.११४

३) जोशी सुधा – कथा : संकल्पना आणि समीक्षा, मौज प्रकाशन, मुंबई.प्रथम आवृत्ती २००० पृष्ठ.१२

४) डॉ. जाधव मनोहर –प्रसार माध्यमे आणि मराठी भाषा, संपादक – डॉ. भास्कर शेळके, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती २०१२

५) उ.नि. पृ.१२४,१२५